कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

नगररचना विभाग

बांधकाम परवानगी क्र. KDMC/TPD/BP/27Village/2022-23/21

Dt 07/12/2022

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ तसेच म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ४५ नुसार स.नं. ४, हि.नं. २/१ व स.नं. १२, हि.नं. १/३, मौजे नांदीवली तर्फे अंबरनाथ मध्ये ७/१२ उताऱ्यानुसार ९५७०.०० चौ.मी. क्षेत्रापैकी नोंदणीकृत कुलमुखत्यारपत्रानुसार ३४३०.०० चौ.मी. क्षेत्र प्राप्त होत असून त्यापैकी किमान हद्दीनुसार प्राप्त होणाऱ्या ३३३४.७७ चौ.मी. क्षेत्राच्या भुखंडांवर शासनाने दि. ०२/१२/२०२० रोजी मंजूर केलेल्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) नुसार Basic FSI विचारात घेऊन एकूण ३३६०.७९ चौ.मी. बांधकाम क्षेत्राच्या भुखंडाचा विकास करावयास केलेल्या दिनांक २१/०६/२०२२ च्या अर्जास अनुसरुन खालील अटी व शर्तीस अधिन राहून, तसेच नकाशावर हिरव्या रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे वाडे–भिंतीच्या बांधकामासह, बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

कल्यण - ५

दस्त क्र. ७९०६ / २०२३

७९ / ६९

बांधकामाचा तपशील :–

इमारत क्र. १ – स्टिल्ट + पहिला मजला ते सातवा मजला (रहिवास)

इमारत क्र. २ – स्टिल्ट (पै), तळ (पै) + पहिला ते तिसरा मजला (म्हाडाकरीता)

अटी व शर्ती :–

१) एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील विनियम क. २.८.३ नुसार प्रत्यक्ष जागेवर बांधकाम सुरु करणेपुर्वी बांधकाम मंजुरीचा फलक लावणे आपणांवर बंधनकारक राहिल.

२) UDCPR मधील विनियम क.1.5 Savings मध्ये नमूद a to h बाबत शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या मार्गदर्शक सूचना आपणांवर बंधनकारक राहील.

३) बांधकाम चालू करण्यापूर्वी सात दिवस आधी महापालिका कार्यालयास लेखी कळविण्यात यावे.

४) UDCPR मधील Appendix-F नुसार वाडेभिंत व जोत्याचे बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिल्पकाराचे प्रमाणपत्र महानगरपालिकेस सादर करण्यात यावे व त्यानंतरच पुढील बांधकाम करण्यात यावे.

५) सदर अभिन्यासात कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करु नये, तसे केल्याचे आढळून आल्यास सदरची विकास परवानगी रद्द समजण्यात येईल.

६) UDCPR मधील विनियम क. १२.१ ते १२.३ नुसार इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षिततेची (स्ट्रक्चरल सेफ्टी) जबाबदारी सर्वस्वी वास्तुशिल्पकार, Structural Engineer व परवानगीधारक यांचेवर राहिल, याची नोंद घ्यावी.

७) सदर जागेत विहीर असल्यास ती संबंधित विभागाच्या परवानगी शिवाय बुजवू नये.

८) सदर जागेतून पाण्याचा नैसर्गिक निचरा होत असल्यास तो जलनि:सारण विभाग,(क.डों.म.पा.) यांचे परवानगीशिवाय वळवू अथवा बंद करु नये.